महाराष्ट्र शासन

क्र. व्हिएलएस-१०८२/६३७४१(प्राशि-३
(सीआर-२७१)
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- १५ नोव्हेंबर, १९८३

प्रति,

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

विषय:- जुन्नर प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी
प्राथमिक शाळेस मान्यता

जुन्नर प्रोग्रेसिव्ह एज्यु. सोसायटी या संस्थेने जुन्नर येथे शेठ नेनसुख रतनचंद मूठा स्कूल या नावाने सुरु केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेस शासनाने घातलेली सर्वसाधारण बंदीची अट अशत: शिथिल करुन अपवादात्मक परिस्थिती "खास बाब" म्हणून कायम विना अनुदान तत्वावर १९८४-८५ पासून खालील अटींच्या आधीन राहून शासन मंजूरी देत आहे.

१. नियमानुसार संस्था रजिस्टर्ड असली पाहिजे.

२. संस्थेने ही प्राथमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्याची व भविष्यकाळात कधीही शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही अशी लेखी संमती दिली पाहिजे.

३. संस्थेने शाळेत्ता एकूण शिक्षक वर्ग विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित (एस.एस.सी.डी.एड.) नेमलाच पाहिजे व त्यांना शासनाने ठरवून दिलेले वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

४. संस्थेने शाळेसाठी स्वतंत्र व आधुनिक शैक्षणिक साहित्याने परिपूर्ण अशी स्वत:ची इमारत उपलब्ध केली पाहिजे.

५. शाळेतील प्रत्येक वर्गानिहाय शासनाने ठरवून दिलेली विद्यार्थी पटसंख्या व हजर संख्या असली पाहिजे.

६. संस्थेने जवळपासच्या शाळेवर/आपल्या शाळेमुळे कोणताही दुष्परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

७. शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे संस्थेने पालन केलेच पाहिजे.

८. शाळेच्या फी चे दर शासनाने विहित केल्यानुसार असले पाहिजे. त्यापेक्षा जादा फी घेता कामा नये.

९. मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधील विहित अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१०. नियमानुसार अनुसूचित जाती/जमातीच्या शिक्षकाचे प्रमाण भरलेच पाहिजे.

२ . आपणास विनंती आहे की, वरील अटींची पूर्तता झाल्यानंतरच या प्रकरणी नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी व आपल्या कार्यपूर्ततेचा अहवाल शासनास यथावकाश पाठवावा.

( वं. मो. व्यवहारे )
सहाय्यक सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद पुणे.
प्रशासनाधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे
सचिव, जुन्नर प्रोग्रेसिव्ह एज्यु.सो. जुन्नर, जि.पुणे
यांचे माहितीसाठी आणि नियमानुसार आवश्यक त्या कार्यवाही साठी अग्रेषित.